


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २५७ ●मंगळवार, दि.१६ डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# 'जलजीवन'साठी भरीव निधी द्या

## खा.बजरंग सोनवणेंनी पाण्यासाठी संसदेचे वेधले लक्ष




**● विविध योजनांना भरीव निधी देण्याबाबत धरला आग्रह**

केज । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात 'हर घर जल' देण्यासाठी जलजीवन मिशन योजना राबवण्यिात येत आहे. परंतु मागील दोन वर्षात या योजनेला निधीच दिला जात नाही.यामुळे योजना मंजूर असूनही गावात पाणी पोहचू शकले नाही. सामान्य नागरिकांना स्वच्छ आणि मुबलक पाणी देण्यासाठी जलजीवन योजना महत्वाची असून यासाठी भरीव निधी द्या, अशी आग्रहाची मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली. याच बरोबर त्यांनी विविध योजनांसाठी निधीची मागणी करत संसदेचे लक्ष वेधले.

दिल्ली येथे सुरू असलेल्या लोकसभा अधिवेशनात खा.बजरंग सोनवणे यांनी मुद्देसूद मांडणी करत बीड जिल्ह्यातील प्रश्न मांडले. संसदेत पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, भारत हा कृषी प्रधान देश आहे. असे असले तरी शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकार भरीव निधी देत नाही. शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविणे आवश्यक आहे. याच बरोबर मराठवाड्यातील धाराशीव-बीड-संभाजीनगर या रेल्वेमार्गासाठी अतिरिक्ति निधीची गरज आहे. सन २०१४ मध्ये भाजप सरकार सत्तेत आलेले आहे. तेव्हापासून जुन्नर-चौंडी-आष्टी या नवीन रेल्वेमार्गाला निधी मिळत नाही. हा मार्ग व्हावा, यासाठी निधीची आवश्यकता आहे. याच बरोबर मागील अनेक वर्षांपासून अहल्यिानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाचे काम सुरू आहे. या कामाला मागील काळात गती मिळू शकली नाही. यामुळे कामाला उशीर झाला. निधी उपलब्ध असताना कामाला गती मिळू शकली नाही. आता काम गतीने सुरू आहे, निधी कमी पडत असल्यास तो तातडीने उपलब्ध करून द्यावा, बीड जिल्ह्यात काही ठिकाणी पोस्ट ऑफिस बंद पडले आहेत, ते पुन्हा सुरू करावेत, शिवाय काही ठिकाणी नवीन कार्यालय देखील सुरू करावेत, तशी नागरिकांची मागणी देखील आहे. आता मोबाईलचा काळ आलेला आहे. परंतु असताना बीड जिल्ह्यात आजही विविध भागात मोबाईलची रेंज पोहचलेली नाही. आम्ही बीड जिल्ह्यात ज्याठिकाणी मोबाईल टॉवरची गरज आहे, अशी यादी केंद्राकडे दिलेली आहे. सदरील ठिकाणी ▶ उर्वरित पान २ वर

## मुनगंटीवार म्हणतात, 'मी नसबंदीचा प्रस्ताव पाठवला, आणि माझे पद गेले..

नागपूर । प्रतिनिधी



राज्याच्या वनमंत्रीपदाची धूरा एकदा नाही तर दोनदा यशस्वीपणे सांभाळणारे आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या वनमंत्रीपदाच्या कार्याकाळात राज्याचे वनखाते खऱ्या अर्थाने 'हायटेक' झाले. वनखात्याचे मुख्यालय विदर्भाची राजधानी व राज्याची उपराजधानी नागपुरात असले तरीही मंत्रीपद कायम विदर्भाबाहेर राहीले. त्यामुळे महत्त्वाचे असूनही हे खाते कायम दुर्लक्षीत राहीले.

दरम्यान, २०१४ साली वनखात्याची धूरा सुधीर मुनगंटीवार यांच्या खांद्यावर आली आणि त्यांनी पहिल्या पाच वर्षात या खात्याचा पूर्णपणे कायापालट केला. दुर्लक्षित राहीलेले हे खाते 'हायटेक' करण्यासोबतच त्यांनी सर्वसामान्यांपर्यंत हे खाते पोहचवले. त्यानंतर दुसऱ्यांदा त्यांच्याकडेच या खात्याची धूरा आली. मात्र, त्यांच्याकडून खाते गेले आणि पुन्हा या खात्याला अवकळा आली. खुद्द खात्यातील काही अधिकारी, कर्मचारी सुधीर मुनगंटीवारच या खात्यासाठी योग्य आहेत, त्यांचीच गरज आज खात्याला आहे, असे खासगीत बोलून दाखवतात.

स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जाणारे माजी वनमंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी नागपुरातील यंदाचे हिवाळी अधिवेशन चांगलेच गाजवले. विरोधकांनी सरकारला कोंडीत पकडणे अपेक्षीत असताना सत्ताधारी पक्षाचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनीच सरकारला धारेवर धरले. विदर्भात हे हिवाळी अधिवेशन होत असल्याने विधानसभा अध्यक्षांना त्यांनी विदर्भाच्या प्रश्नांवर चर्चा होणे अपेक्षीत असल्याचे म्हटले. दरम्यान, त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर त्यांच्याच पक्षातील मंत्र्यांना उत्तर देणे कठीण गेले. एवढेच नाही तर त्यांच्या प्रश्नांच्या वेळी त्या त्या खात्याचे मंत्रीच अनुपस्थित राहील्यामुळे मुनगंटीवारांचा पारा आणखी चढला आणि त्यांनी त्यांच्यावर ▶ उर्वरित पान २ वर

## विद्यार्थ्यांना शारीरिक अन् मानसिक शिक्षा देण्यावर बंदी शिक्षण विभागाने जारी केली नवी नियमावली

मुंबई । प्रतिनिधी



वसई येथील एका शाळेतील सहावीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा शाळेत उशिरा आल्याबद्दल शिक्षा म्हणून १०० उठाबशा करायला लावल्यामुळे मृत्यू झाला. या घटनेमुळे पालकांमध्ये संताप पसरला. या प्रकाराची सरकारनेही गांभीर्याने दखल घेतली असून वसई येथील या शाळेची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. त्याशिवाय शालेय शिक्षण विभागाने सर्व शाळांसाठी नियमावली जारी करत विद्यार्थ्यांना शारीरिक आणि मानसिक शिक्षा देण्यास बंदी घातली आहे.

राज्य शिक्षण विभागाने जारी केलेल्या नवीन निर्देशांनुसार महाराष्ट्रातील शाळांना आता अधिक कठोर बाल सुरक्षा आराखड्याचे पालन करावे लागेल. ज्यात शारीरिक शिक्षा आणि मानसिक छळावर बंदी घातली आहे. त्याशिवाय जर अशा घटना घडल्या तर या गंभीर प्रकरणांमध्ये पोलिसांना वेळेत अहवाल देणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे निर्देश केंद्र सरकारच्या 'शालेय सुरक्षा आणि संरक्षणावरील मार्गदर्शक तत्त्वे (२०२१)' सर्व शाळांवर, मग त्या कोणत्याही मंडळाच्या किंवा व्यवस्थापनाच्या असोत, त्यांच्यासाठी हे नियम बंधनकारक आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळा प्रमुख, कर्मचारी आणि व्यवस्थापनावर थेट जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

## साध्या उलटीच्या त्रासामुळे संस्कृतीला रुग्णालयात नेलं, पण तिथे जे घडलं.! संतप्त कुटुंबाने डॉक्टरांवर केले गंभीर आरोप

बीड । प्रतिनिधी




जिल्ह्यातील शिरूर कासार शहरात एका खासगी रुग्णालयातील डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे १३ वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांनी केला आहे. या घटनेमुळे शहरात संतापाचं वातावरण असून, नागरिक आणि नातेवाईक रस्त्यावर उतरले आहेत.

मृत मुलीचं नाव संस्कृती संजय बारगजे असं आहे. तिला उलटीचा त्रास होत असल्याने शिरूरमधील गुरुदत्त रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. दोन दिवस तिच्यावर उपचार सुरू होते. मात्र ३ नोव्हेंबरच्या मध्यरात्री अचानक तिला श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. कुटुंबीयांचा आरोप आहे की, ही परिस्थिती गंभीर असतानाही ▶ उर्वरित पान २ वर

## बीड - लोकन्यायालयात २३४ प्रकरणे निकाली, ८ लाखांची वसुली

बीड । प्रतिनिधी

लोक न्यायालयात कौटुंबिक कलहातून दोन कुटूंबाचा दुभंगलेला संसार समुपदेशनाने पुन्हा जुळविण्यात आला.

पाटोदा न्यायालयात पार पडलेल्या लोकन्यायालयात पार पडलेल्या समुपदेशनानंतर पती-पत्नीने वाद संपवून एकत्रीतपणे राहण्याचा निर्णय घेतला.या लोकन्यायालयात इतरही २३४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. त्याच प्रमाणे वेगवेगळ्या प्रकरणातून ८ लाख २४ हजार ८८७ रुपयांची वसूली केली. हे लोकन्यायालय पाटोदा न्यायालयाचे मुख्य दिवाणी न्यायाधीश एम. ए. शिंदे, वडवणी न्यायालयाचे न्यायाधीश यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले लोकन्यायालयात दोन कुटूंबाचा वाद मांडण्यात आला. पॅनल क्रमांक १ चे प्रमुख दिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर एम.ए, शिंदे, सदस्य बी.जी. थोरवे, पॅनल क्रमांक २ चे प्रमुख म्हणुनी दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व्ही. डी. गीते, विधीज्ञ बी.आर. लऊळ यांनी या प्रसंगी समुपदेशनाचे कर्तव्य पार पाडले. सदर लोकन्यायालयात चालू वर्षातील एकूण ८८५ दाखल प्रकरणांपैकी ▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्हापरिषद बांधकाम विभागाला आचारसंहितेचा विसर




बीड । प्रतिनिधी

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्यानंतर लागू असलेली आदर्श आचारसंहितेचा जिल्हापरिषद बांधकाम विभागाला विसर पडला असून त्यांनी थेट महा ई-टेंडर प्रणालीवर ३० लाखांच्या कामाची निविदा प्रसिद्ध केल्याचा गंभीर प्रकार बीडमध्ये उघडकीस आला. या बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांनी आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करुन निवडणूक आयोगाच्या निर्देशाला हरताळ फासली आहे. याबाबत वंचित आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अजय सरवदे यांनी केलेल्या तक्रारीनुसार, दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी बीड जिल्हा परिषद बांधकाम विभागाने जिल्हा परिषदेच्या जुन्या आणि नवीन प्रशासकीय इमारतींमधील शौचालये आणि मोकळ्या जागेची स्वच्छता करणे या कामासाठी सुमारे ३० लाखांची निविदा प्रसिद्ध केली. ही निविदा १७ डिसेंबर २०२५ रोजी बंद होणार असून १८ डिसेंबर २०२५ रोजी उघडण्याचे ▶ उर्वरित पान २ वर

## १०वीच्या मुलावर खासगी क्लासमध्ये चाकूने वार, उपचारादरम्यान मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

पुण्याच्या राजगुरूनगरमध्ये दहावीतील मुलाची हत्या झाली, मित्रानेच खासगी क्लासमध्ये शिक्षक शिकवत असतानाच गळा चिरुन तो पसार झाला. या घटनेनंतर एकच खळबळ उडाली. तर हल्ल्यात मृत्यू झालेल्या विद्यार्थ्याच्या वडिलांनी सांगितलं की, माझ्या मुलाची हत्या करणाऱ्या मुलाने तीन दिवसांपूर्वी ही त्याला मारहाण केली होती. त्याचवेळी शिकवणीच्या शिक्षकांनी माहिती द्यायला हवी होती. असं झालं असतं तर माझा एकुलता एक मुलगा आज माझ्यासोबत असता, असं उद्विग्न झालेल्या वडिलांनी म्हटलंय. माझ्यावर आलेली वेळ इतर कोणावर येऊ नये, यासाठी पोलिसांनी कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी वडिलांनी केली आहे. या घटनेबाबत मृत विद्यार्थ्यांच्या वडिलांनी सांगितलं की, आम्हाला कल्पना नाही. तीन ते चार दिवसांपूर्वी चार-पाच मुलांनी मिळून त्याला मारलं होतं आणि आज सकाळी तो क्लासला गेला होता. मला आमच्या आईचा साडेनऊ वाजता फोन आला तू लवकर ▶ उर्वरित पान २ वर

## राज्यात महानगर पालिका निवडणुका जाहीर, १५ जानेवारीला मतदान, १६ ला मतमोजणी

मुंबई । प्रतिनिधी



राज्यातील २९ महापालिका निवडणुकांची घोषणा राज्य निवडणूक आयोगाकडून करण्यात आली असून मुदत संपलेल्या २७ महापालिका आणि नव्याने निर्माण झालेल्या इचलकरंजी आणि जालना असा २९ महापालिकांसाठी आणि २०६९ सदस्यांसाठी ही निवडणूक होत आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली. त्यासाठी, मुंबईसह राज्यातील सर्वच महापालिकांच्या निवडणुकांसाठी १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होईल. मुंबई महापालिकेसाठी वार्ड रचना असल्याने मतदारांना एक मत द्यायचं आहे, तर इतर महापालिकेत बहुसदस्यीय संख्या म्हणजेच प्रभाग रचना अस्याने तीन ते पाच मते द्यावी लागतील. निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेतील १० मुद्दे १. राज्यात महापालिका निवडणुकांसाठी एकूण ३.४८ कोटी एकूण मतदार आहेत, त्यासाठी ३९१४७ मतदार केंद्र असतील, मुंबईसाठी १०,१११ मतदारकेंद्र, ११,३४९ कंट्रोल यूनिट आणि २२,००० बॅलेट यूनिट असतील. २. १ जुलै २०२५ ची मतदार यादी अंमलात आणली जाईल. भारत निवडणूक आयोगाकडून यादी घेण्यात आली असल्याने नाव वगळण्याचे ▶ उर्वरित पान २ वर

## स्कॉर्पिओ आणि कारची समोरासमोर धडक, ३ जण जागीच ठार, बीडमधील घटना



बीड । प्रतिनिधी

बीडमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. अंबेजोगाई- लातूर राष्ट्रीय महामार्गावर भीषण स्कॉर्पिओ आणि कारचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात ३ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दोन जण गंभीर जखमी झाले आहे. जखमींना तातडीने लातूर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बीड-लातूर जिल्ह्याच्या सीमेजवळ सोमवारी रात्री हा भीषण अपघात झाला आहे. स्कार्पिओ गाडी आणि कारचा समोरासमोर धडक झाली आहे. या भीषण अपघातात तीन जण जागीच ठार झाले आहेत. तर दोघे गंभीर जखमी झाले आहे. अपघातातील जखमी आणि मयत कोणत्या गावचे आहेत ही बातमी लिहूपर्यंत माहिती मिळू शकली नाही.

# शॉकींग! एक कोटीच्या इन्शुरन्साठी स्वत:चा 'मृत्यू';

## लिफ्ट मागणाऱ्या वृद्धाचा जिवंत जाळून खून, उलगडलं सत्य

लातूर । प्रतिनिधी


एक कोटीचा इन्शुरन्स,स्वतःच्या 'मृत्यू'चा डाव फसला

एक कोटीच्या विम्यासाठी स्वतःच्या मृत्यूचा बनाव करत लिफ्ट मागणाऱ्या वृद्धाचा हकनाक बळी घेतल्याची धक्कादायक घटना लातूरमध्ये उघडकीस आली. पोलिसांनी घडल्या प्रकाराचा अवघ्या २४ तासांत छडा लावल्याने या घटनेचं सत्य उलगडलं आहे. डोक्यावरील कर्जातून सुटका मिळवण्यासाठी एका व्यक्तीने स्वतःच्या मृत्यूचा बनाव रचला. विशेष म्हणजे, या बनावासाठी लिफ्ट मागणाऱ्या एका निरपराध वृद्धाचा खून करण्यात आल्याची खळबजनक घटना लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यात घडली. याप्रकरणी, आरोपीविरुद्ध खुनासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आलाय.

औसा तालुक्यातील वानवडा शिवारात मध्यरात्री स्कोडा कंपनीची चारचाकी गाडी अचानक पेट घेऊन पूर्णपणे जळून खाक झाली. या घटनेत गाडीतील चालकाचा होरपळून मृत्यू झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. मृताचे वय अंदाजे (३५) वर्षे असल्याचे सांगण्यात येत होते. वाहनात सापडलेल्या काही वस्तूंवरून हा मृतदेह औसा तांडा येथील गणेश चव्हाण याचा असल्याचा समज निर्माण झाला होता. मात्र, हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय पोलिसांना आला.

▶ उर्वरित पान २ वर



# विजय दिवस : राष्ट्राच्या शौर्याचा, त्यागाचा आणि ऐक्याचा अमर गौरव



भारताच्या इतिहासात १६ डिसेंबर हा दिवस अभिमानाने उजळून निघतो . विजय दिवस म्हणून साजरा होणारा हा दिवस १९७१ च्या भारत–पाक युद्धातील ऐतिहासिक विजयाचे स्मरण करून देतो . हा विजय केवळ रणांगणावरील नव्हता ; तो मानवतेचा , न्यायाचा आणि राष्ट्रनिर्मितीच्या मूल्यांचा विजय होता . या युद्धातून बांगलादेशाचा जन्म झाला आणि भारताने दक्षिण आशियातील राजकीय नकाशा बदलून टाकला .१९७१ मध्ये तत्कालीन पूर्व पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या अत्याचारांमुळे लाखो निर्वासित भारतात आले . मानवी संकटाच्या या पार्श्वभूमीवर भारताने धैर्याने उभे राहत अन्यायाविरुद्ध भूमिका घेतली . भारतीय लष्कराने केवळ सैनिकी कौशल्य नव्हे , तर शिस्त , संयम आणि रणनीतीचे सर्वोच्च दर्शन घडवले . १३ दिवसांच्या निर्णायक युद्धानंतर १६ डिसेंबर १९७१ रोजी ढाका येथे पाकिस्तानी सैन्याने शरणागती पत्करली . जवळपास ९३ हजार पाकिस्तानी सैनिकांनी शस्त्रे खाली ठेवली – हा दुसऱ्या महायुद्धानंतरचा सर्वात मोठा शरणागतीचा प्रसंग मानला जातो .

विजय दिवस हा सैनिकांच्या पराक्रमाइतकाच त्यांच्या त्यागाचा दिवस आहे . सीमेवर उभे राहून मातृभूमीचे रक्षण करणाऱ्या जवानांचे धैर्य , कुटुंबापासून दूर राहून केलेले बलिदान , आणि राष्ट्रासाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीरांची आठवण – या सर्वांचा हा सन्मानदिन आहे . भारतीय नौदल , वायुदल आणि थलसेना – तिन्ही दलांनी समन्वयाने काम करून शत्रूची कोंडी केली . हा विजय संयुक्त शक्ती , नियोजन आणि नेतृत्व यांचा परिणाम होता. विजय दिवस आपल्याला राष्ट्रीय ऐक्याचे महत्त्व शिकवतो . संकटाच्या काळात देश एकत्र उभा राहिला , राजकीय मतभेद बाजूला ठेवले गेले , आणि मानवतेच्या बाजूने ठाम भूमिका घेतली गेली . याच मूल्यांमुळे भारत आजही शांतता , लोकशाही आणि मानवी हक्कांचा समर्थक म्हणून ओळखला जातो . आज विजय दिवस केवळ इतिहासाची आठवण नाही ; तो भविष्यासाठी प्रेरणा आहे . तो आपल्याला सांगतो की स्वातंत्र्य , सार्वभौमत्व आणि शांतता टिकवण्यासाठी सज्जता आवश्यक असते . सैनिकांचा सन्मान करणे , त्यांच्या कुटुंबांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे , आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च मान देणे – हाच विजय दिवसाचा खरा अर्थ आहे. विजय दिवसाच्या निमित्ताने आपण संकल्प करूया – राष्ट्राच्या एकतेला जपू , अन्यायाविरुद्ध आवाज उठवू , आणि देशासाठी झटणाऱ्या प्रत्येक जवानाच्या त्यागाला मान देऊ .विजय दिवस चिरायू होवो ! भारत माता की जय !

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार , बीड**

# विजय दिन : भारतीय शौर्य, एकता आणि आत्मसन्मानाचा गौरव

१६ डिसेंबर हा दिवस भारतीय राष्ट्रजीवनात अभिमान, आत्मविश्वास आणि ऐतिहासिक स्मृतींनी भारलेला दिवस आहे. हा दिवस 'विजय दिन' म्हणून साजरा केला जातो. १६ डिसेंबर १९७१ रोजी भारताने पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात निर्णायक विजय मिळवला आणि बांगलादेश या स्वतंत्र राष्ट्राचा जन्म झाला. हा विजय केवळ रणांगणावर मिळालेला लष्करी विजय नव्हता, तर तो भारतीय राष्ट्रशक्तीचा, राजकीय दूरदृष्टीचा आणि मानवी मूल्यांवरील ठाम विश्वासाचा परिणाम होता. म्हणूनच विजय दिन हा केवळ सैन्याच्या शौर्याचा उत्सव नसून, तो संपूर्ण देशाच्या एकतेचा, त्यागाचा आणि आत्मसन्मानाचा ऐतिहासिक साक्षीदार आहे. १९७१ च्या युद्धाची पार्श्वभूमी समजून घेतल्यास विजय दिनाचे महत्त्व अधिक स्पष्ट होते. तत्कालीन पाकिस्तान भौगोलिकदृष्ट्या दोन वेगळ्या भागांमध्ये विभागलेला होता त्यामध्ये पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान हे दोन भाग होते. भौगोलिक अंतरासोबतच या दोन भागांमध्ये भाषिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक दरी खोल होती. पूर्व पाकिस्तानातील बंगाली भाषिक लोकसंख्या बहुसंख्य असूनही सत्ता, प्रशासन आणि लष्करावर पश्चिम पाकिस्तानचे वर्चस्व होते. पूर्व पाकिस्तानावर सातत्याने अन्याय, भेदभाव आणि दडपशाही केली जात होती. लोकशाही मार्गाने व्यक्त झालेल्या जनतेच्या इच्छेचा अवमान करण्यात आला. या अन्यायाविरोधात उठलेला आवाज दडपण्यासाठी अमानुष अत्याचार करण्यात आले, ज्यामुळे परिस्थिती अधिकच चिघळली होती.

या दडपशाहीचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांना बसला. लाखो लोकांची कत्तल झाली, महिलांवर अमानवी अत्याचार झाले आणि असंख्य कुटुंबे उद्ध्वस्त झाली. या भयावह परिस्थितीमुळे सुमारे एक कोटी निर्वासित भारतात आश्रयासाठी आले. हा केवळ सीमावर्ती प्रश्न नव्हता, तर तो भारतासमोरील एक मोठे मानवी आणि राष्ट्रीय आव्हान होते. भारताने या संकटाकडे केवळ शेजारी राष्ट्राचा अंतर्गत प्रश्न म्हणून पाहिले नाही, तर मानवी दृष्टिकोनातून त्याची दखल घेतली. निर्वासितांसाठी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्यसेवा आणि सुरक्षिततेची व्यवस्था करण्यात आली. या काळात भारतीय समाजाने दाखवलेली करुणा आणि सहिष्णुता ही भारताच्या सांस्कृतिक मूल्यांची साक्ष देणारी ठरली.

या परिस्थितीत भारताने युद्धात उतरण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय सहज किंवा घाईघाईने घेतलेला नव्हता. आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक दबाव असतानाही भारताने अन्यायाविरोधात उभे राहण्याची भूमिका घेतली. ३ डिसेंबर १९७१ रोजी युद्धाला सुरुवात झाली आणि भारतीय सैन्याने अत्यंत शिस्तबद्ध, नियोजनबद्ध आणि धैर्याने युद्ध लढले. भारतीय लष्कर, नौदल आणि वायुदल यांच्यातील उत्कृष्ट समन्वयामुळे युद्धाची दिशा लवकरच भारताच्या बाजूने झुकली. अवघ्या तेरा दिवसांत युद्धाचा निर्णायक शेवट झाला आणि १६ डिसेंबर १९७१ रोजी ढाका येथे पाकिस्तानी सैन्याने शरणागती पत्करली. सुमारे ९३ हजार पाकिस्तानी सैनिकांनी शस्त्र खाली ठेवली. आधुनिक युद्धइतिहासातील ही सर्वात मोठ्या शरणागतींपैकी एक मानली जाते.

विजय दिन हा भारतीय सैन्याच्या शौर्याचा, शिस्तीचा आणि त्यागाचा गौरव करणारा दिवस आहे. देशाच्या सीमेवर उभे राहून सैनिकांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता मातृभूमीचे रक्षण केले. अनेक जवानांनी आपले सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या या त्यागामुळेच आज भारत सुरक्षित, स्वाभिमानी आणि सार्वभौम आहे. विजय दिन साजरा करताना या शहीदांचे स्मरण करणे ही प्रत्येक भारतीयाची नैतिक जबाबदारी आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी सहन केलेला त्याग आणि वेदना कधीही विसरता कामा नयेत.

या विजयामागे केवळ सैन्याची ताकद नव्हती, तर संपूर्ण देशाची एकजूट होती. युद्धकाळात देशातील नागरिकांनी अभूतपूर्व संयम आणि राष्ट्रभक्ती दाखवली. राजकीय मतभेद, प्रादेशिक भिन्नता आणि सामाजिक अंतर बाजूला ठेवून संपूर्ण देश एकसंधपणे उभा राहिला. उद्योगधंदे, शेतकरी, कामगार, आरोग्य कर्मचारी, माध्यमे आणि सामान्य नागरिक यांनी आपल्या परीने राष्ट्रहितासाठी योगदान दिले. ही एकजूटच भारताची खरी ताकद आहे, हे १९७१ च्या युद्धाने स्पष्टपणे दाखवून दिले.

विजय दिन हा भारताच्या राजकीय परिपक्वतेचेही प्रतीक आहे. युद्ध जिंकल्यानंतर भारताने अहंकार, सूडभावना किंवा आक्रमक धोरण स्वीकारले नाही. युद्धकैद्यांशी आंतरराष्ट्रीय नियमांनुसार मानवी वागणूक देण्यात आली. शिमला कराराच्या माध्यमातून शांततेचा आणि संवादाचा मार्ग स्वीकारण्यात आला. ही भूमिका भारताच्या शांततावादी आणि जबाबदार राष्ट्र म्हणून असलेल्या प्रतिमेला अधिक बळ देणारी ठरली. सामर्थ्य असूनही संयम राखणे आणि स्थैर्याला प्राधान्य देणे, हीच भारताची खरी ओळख आहे.

आजच्या काळात विजय दिनाचे महत्त्व अधिक व्यापक स्वरूपात समजून घेण्याची गरज आहे. जागतिक पातळीवर वाढते संघर्ष, युद्धसदृश परिस्थिती आणि अस्थिरता पाहता १९७१ चा विजय आपल्याला आत्मविश्वास देतो. तो आपल्याला आठवण करून देतो की, भारत कोणत्याही संकटाला समर्थपणे सामोरे जाण्याची क्षमता राखतो. विजय दिन हा केवळ भूतकाळाचा गौरव नसून तो वर्तमान आणि भविष्याचा आत्मविश्वास आहे.

विजय दिन युवकांसाठी विशेष प्रेरणादायी ठरतो. आजचा युवक उद्याचा भारत घडवणार आहे. या दिवसातून त्याला देशप्रेम, कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि त्यागाची शिकवण मिळते. सैन्यात भरती होणे हीच देशसेवा नाही, तर प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावणे, समाजात सकारात्मक बदल घडवणे आणि राष्ट्रीय एकतेचे जतन करणे हेही देशसेवेचेच स्वरूप आहे. विजय दिन युवकांमध्ये जबाबदारीची जाणीव जागवतो.

विजय दिन साजरा करताना तो केवळ औपचारिक कार्यक्रम, परेड किंवा भाषणांपुरता मर्यादित ठेवू नये. स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि सार्वभौमत्व सहज मिळालेले नसून त्यासाठी असंख्य बलिदानांची किंमत मोजावी लागलेली आहे, याची जाणीव प्रत्येक नागरिकाने ठेवली पाहिजे. राष्ट्राच्या एकतेला, अखंडतेला आणि सुरक्षिततेला बाधा पोहोचवणाऱ्या शक्तींविरोधात सजग राहणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

विजय दिन हा भारतीय इतिहासातील एक सुवर्णक्षण आहे. हा दिवस आपल्याला अभिमानाने मान उंचावायला शिकवतो, पण त्याचबरोबर जबाबदारीची जाणीवही करून देतो. शौर्य, शिस्त, एकता आणि शांततेचा संदेश देणारा विजय दिन प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रप्रेम अधिक दृढ करतो. १६ डिसेंबर हा दिवस केवळ स्मरणाचा नसून संकल्पाचा दिवस आहे. भारताच्या सुरक्षित, समृद्ध आणि सशक्त भविष्यासाठी एकजुटीने पुढे जाण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. म्हणूनच विजय दिन हा भारतीय शौर्याचा, आत्मसन्मानाचा आणि इतिहास घडविणाऱ्या विजयाचा अमर उत्सव आहे.

– डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान १ वरून पुढे...

## 'जलजीवन'साठी...

नवीन मोबाईल टॉवर उभारावेत, बीड जल्हि्यात दळणवळणाचा मोठा प्रश्न आहे. केंद्रीय रस्ते मंत्री नितीन गडकरी हे देशभर रस्त्याचे जाळे नर्मिाण करत आहेत. बीड जल्हि्यात देखील चार पदरी आणि सहा पदरी महामार्गाची गरज आहे. अनेक महत्वाच्या मार्गाची आम्ही मागणी केलेली असून ती रस्त्याची मागणी मार्गी लावावी, जल्हि्यात आरोग्य यंत्रणेचा बोजवारा उडत आहे. आरोग्य केंद्रांमध्ये सुविधा मिळत नाहीत. आरोग्य केंद्रांना मोठा निधी देवून आरोग्याच्या बाबतीतील प्रश्न सोडवावेत, बीड जल्हिा हा ऊसतोड मजूरांचा जल्हिा आहे. या जल्हि्यातून महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर देखील मजूर काम करतात. अशावेळी त्यांच्या पाल्यांची शाळा सुटते. त्यांच्या पाल्यांसाठी साखर कारखान्यावर शाळा सुरू करण्यात याव्यात, पंतप्रधान आवास योजनेमधून बीड जल्हि्यात मोठ्या प्रमाणात घरे मंजूर केलेली आहेत. परंतु सद्यस्थितीत मिळत असलेल्या निधीतून घराचे बांधकाम पुर्ण होत नाही. यामुळे प्रधानमंत्री अवास योजनेसाठी किमान ५ लाख रूपये निधी द्यावा, ५ लाख रूपये निधी दल्यिास गरीबांचे घर पुर्ण होईल. बीड जल्हि्यात जलजीवन मिशन योजनेतून साडेबाराशेवर योजना मंजूर आहेत. या योजनेतून हर घर जल देण्याचा उद्देश आहे. परंतु दोन–तीन वर्षांपासून निधी दिला जात नसल्याने योजना अपुर्ण आहेत. या योजनेला पैसे दिले तर गावात नळाला पाणी दिसेल. मग्रारोहयोमधून चांगली कामे करता येतात, परंतु त्यालाही निधी द्या, यामुळे मजूरांच्या हाताला काम मिळत नाही. या योजनेसाठी देखील निधी द्यावा आणि अल्पसंख्याक समाजातील वद्यिार्थ्यांसाठी वसतिगृह द्यावे, त्यांच्या लेकरांचे शिक्षण व्हावे, त्यांनीही नोकरी करावी, यासाठी केंद्र सरकारने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागण्या खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत केल्या.

## मुनगंटीवार म्हणतात...

बिबट सोडा अशीही मागणी केली. बाहेर काही प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी बिबट नियंत्रणासाठी कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञान वापरण्याविषयी सांगितले.

## साध्या उलटीच्या...

डॉक्टरांनी वेळीच योग्य उपचार केले नाहीत आणि त्याचमुळे तिचा मृत्यू झाला. संस्कृतीच्या मृत्यूसाठी गुरुदत्त रुग्णालयातील डॉ. प्रशांत

◆ पान १ वरून पुढे...

ढाकणे जबाबदार असल्याचा आरोप तिच्या आई–वडिलांनी केला आहे. या घटनेनंतर संतप्त झालेल्या नागरिकांनी आणि नातेवाईकांनी शहरातील मुख्य चौकात ठिय्या आंदोलन करत डॉक्टरांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या प्रकरणी पालकांनी डॉक्टरांविरुद्ध तक्रार दाखल केली असली, तरी महिनाभर उलटूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असा त्यांचा आरोप आहे. त्यामुळे आता न्याय मिळेपर्यंत तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू करण्यात आलं आहे. दरम्यान, या आरोपांबाबत विचारणा केली असता डॉ. प्रशांत ढाकणे यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. मला न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे, असं सांगत त्यांनी बोलणं टाळलं. या घटनेची सखोल चौकशी करून पीडित कुटुंबाला लवकर न्याय मिळावा, अशी मागणी शिरूर कासारमधील नागरिकांकडून होत आहे.

## बीड – लोकन्यायालयात...

२३ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये दोन कौटुंबिक वादांमध्ये समेट घडवून पती–पत्नींचे वैवाहिक जीवन पूर्ववत करण्यात आले. दाखल असलेल्या ८९८ प्रकरणांपैकी २११ प्रकरणे यशस्वीपणे निकाली निघाली.

## बीड जिल्हापरिषद ...

नियोजन आहे. विशेष म्हणजे, बीड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या हद्दीत दिनांक २१ डिसेंबर २०२५ पयरत आदर्श आचारसंहिता लागू आहे. जिल्हापरिषद कार्यालय हे थेट बीड शहराच्या हद्दीत येत असतानाही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पदाचा दुरुपयोग करून निविदा प्रक्रिया राबविल्याचा पुरावा तक्रारीसोबत देण्यात आला आहे. या कृत्यामुळे निवडणुकीदरम्यान शासकीय यंत्रणेचा गैरवापर होत असून, निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेच्या पवित्रतेवर थेट प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हे कृत्य राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशांचे तसेच भारतीय संविधानातील निष्पक्ष निवडणूक तत्त्वांचे सरळ उल्लंघन असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी तक्रारीत नमूद केले आहे. आचारसंहितेच्या कालावधीत प्रसिद्ध झालेली सदर महा–ई–टेंडर निविदा तात्काळ रद्द करण्यात यावी, आचारसंहिता भंग करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनासह कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून अहवाल

◆ पान १ वरून पुढे...

सार्वजनिक करण्यात यावा. तसेच, तात्काळ व ठोस कारवाई न झाल्यास हे प्रकरण मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे सादर करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आल्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. प्रश्न एकच आचारसंहिता फे कागदापुरती आहे का, की प्रशासनालाही ती बंधनकारक आहे? बीडमधील या प्रकरणाकडे आता सवारचे लक्ष लागले आहे.

## १०वीच्या मुलावर...

दवाखान्यात जा. मुलांची काहीतरी भांडण झालेली आहेत, त्यानंतर मी दोन ते तीन दवाखाने शोधले, त्यानंतर मला सांगण्यात आलं की, सरकारी दवाखान्यामध्ये या, मी तिथे गेलो पण मला त्याची अवस्था बघवत नव्हती, तीन महिन्यापूर्वी वाद झाला असल्याची काहीही कल्पना मला नाही, मात्र तीन–चार दिवसांपूर्वी त्याला मारहाण करायला काहीजण आले होते, कशावरून झालं आणि काय झालं याचं नेमकं कारण अद्याप आम्हालाही माहिती नाही. एका विद्यार्थ्याने क्लासमध्येच मित्रावर जीवघेणा हल्ला केला आणि तो तिथून फरार झाला. शिक्षक शिकवत असताना अचानक हा मुलगा उठला त्याने सोबत आणलेला चाकू बॅगेतून काढला आणि शेजारीच बसलेल्या दुसऱ्या मित्रावर वार केला. या मुलाने मित्राचा गळा चिरला. या हल्ल्यात विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. या हल्ल्यात मृत्यू झालेला आणि हल्ला करणारा हे दोघेही दहावीचे विद्यार्थी आहेत.

## राज्यात महानगर...

अधिकार राज्य निवडणूक आयोगाला नाहीत ३. दुबार मतदारांची ओळख केली असून त्यांच्या नावासमोर दोन स्टार असतील. दुबार मतदारांच्या घरी जाऊन सर्वेक्षण केलं आहे. तसेच, मतदान कुठे करणार हे प्रतिज्ञापत्र त्यांच्याकडून घेण्यात आले आहे. ४. मुंबईत ११ लाख संभाव्य दुबार मतदार आहेत, मुंबईतील यादीच्या ७ टक्के दुबार मतदार आढळून आले आहेत. दुबार मतदारांपैकी ज्यांचा सर्व्हे झाला नाही, त्यांच्याकडून मतदान केंद्रावर हमीपत्र घेतलं जाईल. ५. मुंबईतील निवडणुकांसाठी २९० अधिकाऱ्यांची नेमणूक असून राज्यात ८७० अधिकाऱ्यांची नेमणूक, १,९६,६०५ कर्मचारी असणार आहेत. निवडणुकांसाठी ४८ तास आधी प्रचारावर निर्बंध येतील. त्यानंतर, जाहिरातींवर बंदी असेल ६. राज्यातील २९ महापालिकेच्या २८६९ जगांसाठी निवडणूक होत आहे. त्यामध्ये, १४४२ महिला, ३४१ अनुसूचित जाती, ७७ अनुसूचित जमाती, इतर

◆ पान १ वरून पुढे...

मागास प्रवर्ग ७५९ अशी सदस्यसंख्या असेल. ७. नागपूर आणि चंद्रपूरसह काही महानगरपालिकांमध्ये आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. आरक्षण ५० टक्क्यांवर चात असले तरी, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अशा महानगरपालिकांच्या निवडणुका तात्काळ कंडक्ट करण्याचे आदेश दिले आहेत. ८. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांसंदर्भात ५० टक्क्यांपेक्षा कमी आरक्षण असलेल्या जिल्हा परिषदांमध्ये निवडणुका घेण्याचे सर्वोच्च आदेश आहेत, अशा १२ जिल्हा परिषदा आहेत, त्यांच नियोजन सुरू आहे. ३१ जानेवारीच्या आधी त्याही निवडणुका घ्यायच्या आहेत. ९. प्रचारासाठी राजकीय पक्षांकडे केवळ २९ दिवस १०. असा असेल महापालिका निवडणुकीचा कार्यक्रम? × नामनिर्देशन पत्र स्वीकारणे – २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर × अर्जाची छाननी – ३१ डिसेंबर × उमेदवारी माघारीची मुदत – २ जानेवारी × चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवार यादी – ३ जानेवारी × मतदान – १५ जानेवारी × निकाल – १६ जानेवारी

## शॉकींग! एक...

तपासादरम्यान गणेश चव्हाण याच्या कॉल डिटेल्स तपासण्यात आल्या. त्यातून काही महत्त्वाचे धागेदोरे हाती लागले आणि अखेर अवघ्या २४ तासांत गणेश चव्हाण जिवंत असल्याचे स्पष्ट झाले. स्वतःच्या मृत्यूचा बनाव करून तो फरार झाल्याचेही पोलीस तपासात उघडकीस आले. दरम्यान, याप्रकरणी, पोलिस पुढील तपास करत असून आरोपीविरोधात खून, फसवणूक व इतर गंभीर कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पैशासाठी रचलेला अमानुष कट– औसा तांडा येथील रहिवासी असलेला गणेश चव्हाण एका खाजगी फायनान्स कंपनीत कार्यरत होता. त्याच्यावर मोठ्या प्रमाणात कर्ज होते. अनेक आर्थिक व्यवहार अडचणीत आले होते, फ्लॅटचे हप्तेही थकले होते. या संकटातून सुटका मिळवण्यासाठी त्याने आधी एक कोटी रुपयांचा विमा उतरवला आणि नंतर स्वतःच्या मृत्यूचा बनाव रचला. तुळजापूर टी–पॉईंट परिसरात लिफ्ट मागणाऱ्या गोविंद यादव (वृद्ध) याला त्याने गाडीत बसवले. पुढे त्याचा खून करून मृतदेह ड्रायव्हर सीटवर ठेवण्यात आला आणि गाडीला आग लावण्यात आली. आपणच मृत असल्याचे सिद्ध करण्यासाठी आरोपीने स्वतःचे कडे मृतदेहाजवळ ठेवले होते. मात्र, काही संशयास्पद बाबींमुळे पोलिसांचा संशय बळावला. तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यात आली आणि अखेर गणेश चव्हाण पोलिसांच्या हाती लागला. या घटनेत निष्पाप वृद्धाचा हकनाक बळी गेल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## कुंभार समाजाच्या...

हे प्रशिक्षण शिबीर राबवण्यात आले. प्रशिक्षक स्वप्निल कुमार यांनी सहभागी कारागिरांना विद्युत चाकावर काम करण्याचे आधुनिक प्रशिक्षण दिले. महाराष्ट्र कुंभार महासंघाचे अध्यक्ष विनायक राऊत यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, या उपक्रमासाठी आणि कुंभार समाजाच्या प्रश्नांसाठी आमदार सुरेश धस यांचे वेळोवेळी मोलाचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले आहे.यावेळी निशिकांत गरगडे, मुकुंद गरगडे,शांतीनाथ देशमुख, स्वप्नील कुंभार, संतोष देशमुख, ज्ञानेश्वर पालकर, लक्ष्मण देशमुख, प्रशांत देशमुख, अरुण देशमुख, सोपान बावदानकर, विशाल देशमुख, पत्रकार किरण पोकळे, सचिन रानडे, प्रवीण कदम, प्रणव देशमुख, अविनाश कदम, बाबुराव कदम, यांच्यासह लाभार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन राजेंद्र लाड यांनी तर आभार अरुण देशमुख यांनी मानले.

## गृहरक्षक दलाचा...

तालुका कार्यालयात साजरा होत आहे या सप्ताहात असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे आज स्वच्छता अभियानात १२ महिला व ६१पुरुष एकुण ७३ जवानांनी भरपूर प्रमाणात सहभाग घेतला असून या जवानांना योग्य ते मार्गदर्शन पलटण नायक बी जी कुलथे शेख बाहोधीन अविनाश उंबरे सुग्रीव घूले विदुर यांनी गृहरक्षक जवानांना केले

◆ पान ४ वरून पुढे...

या वेळी स्वच्छता अभियान दरम्यान वरील जवानांना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी योग्य ते मार्गदर्शन करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## चिंचोली माळी...

शिक्षा देण्यात यावी.चिंचोली माळी येथील कर्मवीर विद्यालयाची २००५ ते २०२५ पर्यंत सखोल चौकशी करण्यात यावी , पटसंख्ये पेक्षा जास्त शिक्षक असणाऱ्या शिक्षकांना निलंबित करण्यात यावे, कर्मवीर विद्यालय १० बोर्ड परीक्ष केंद्र आहे परीक्षा केंद्रावर सुविधा उपलब्ध असतात त्या नियमानुसार आहेत का याची चौकशी करण्यात यावी सुविधा नसतील परीक्षा केंद्र रद्द करण्यात यावे,संस्थे मध्ये एसटी चा व्यक्ती भरला आहे त्याची जात वैधता भोगस आहे का त्यांची चौकशी करण्यात यावी,तसेच कर्मवीर विद्यालयातील सर्व शिक्षकांची शैक्षणिक गुणवत्ता तपासणी करण्यात यावी ,शिक्षक भरती करण्यासाठी शिक्षकांकडून संस्थाचालकांनी अंदाजित आठ नऊ लाख रुपये घेतले आहे व दंडमशाहीने शिक्षकांन कडुन संस्थाचालकाने तुम्ही मला पैसे दिले नाहीत असे बॅन्ड प्रमाणपत्र लीहुन घेतले आहेत असे समजले जाते तरी यांची चौकशी प्रशासनाने करण्यात यावी जर असे झाले असेल तर संस्थाचालक यांच्यावर कारवाई करण्यात अशा मागण्यासाठी १७ /१२/२०२५ रोजी श्री संत नामदेव महाराज सभागृह येथे अन्नत्याग उपोषणाला बसणार आहे तरी मला उपोषणा दरम्यान काही झाले माझे बरेवाईट झाले तर प्रशासन केज तहसीलदार, जिल्हाधिकारी साहेब लोकप्रतिनिधी व वरील विभागाचे अधिकारी जबाबदार राहतील अशी

◆ पान ४ वरून पुढे...

निवेदनाद्वारे विनंती करण्यात येत आहे तरी माझ्या अन्नत्याग उपोषणाची दखल प्रशासनाने घ्यावी ही नंम्र विनंती असे निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

## 'हमारा शौचालय....

व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जागतिक शौचालय दिनाचे औचित्य साधून दि. १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ दरम्यान हमारा शौचालय, हमारा भविष्य ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत बीड जिल्ह्यातील १३५६ गावांमधील वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची तपासणी, दुरुस्ती व रंगरंगोटी करून ती वापरात आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण तसेच उमेद विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केले आहे. मात्र प्रत्यक्षात ही मोहीम कागदोपत्रीच राबविण्यात येत असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे. आजही अनेक शाळा व अंगणवाड्यांमध्ये शौचालयांचा अभाव असून, त्यामुळे विद्यार्थ्यांना शौचालयासाठी घरी जावे लागते किंवा उघड्यावर जाण्याची वेळ येते, ही गंभीर बाब आहे. प्रमुख मागण्या– जिल्हा परिषद शाळा व अंगणवाड्यांमध्ये वस्तुस्थितीचा सर्वेक्षण अहवाल तयार करावा. आवश्यक ठिकाणी नवीन शौचालयांची बांधणी करावी. नादुरुस्त शौचालयांची तातडीने दुरुस्ती व रंगरंगोटी करावी. मोहीम केवळ कागदोपत्री न ठेवता प्रत्यक्षात प्रभावी अंमलबजावणी करावी

◆ पान ४ वरून पुढे...

## राज्यस्तरीय प्रश्नमंजूषेत...

आयुर्वेद महाविद्यालया कडून तीन संघ सहभागी झाले होते. प्रत्येक संघामध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील प्रत्येकी एक विद्यार्थी सहभागी होता. आयुर्वेदाच्या विविध संहितांवर आधारित प्रश्नसंच तयार करण्यात आला होता. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी मागील तीन महिन्यांपासून सातत्यपूर्ण आणि कठोर परिश्रम घेतले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य वैद्य विवेक कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थ्यांना या स्पर्धे साठी विशेष प्रोत्साहन दिले होते. या यशामुळे महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही नवी प्रेरणा मिळाली. या यशाबद्दल आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थांचे विशेष अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या सभागृहात विजेत्या विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्राचार्य वैद्य विवेक कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, अभ्यासात सातत्य ठेवले तर दृष्टी व्यापक होते आणि ज्ञानाला नवे आयाम प्राप्त होतात, असे गौरवोद्गार काढले. राज्यस्तरीय यशामुळे आदित्य आयुर्वेद महाविद्यालय, बीडने पुन्हा एकदा आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची ठळक छाप उमटवली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# इचलकरंजी पाणी पुरवठा व जीएसटी परतावा प्रश्नी लवकरच कार्यवाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### छत्रपती संभाजी महाराज 'श्री शंभू तीर्थ' पुतळ्याचे अनावरण

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मिनी मँचेस्टर म्हणून ओळख असलेल्या आणि औद्योगिक कामगार नगरी असलेल्या इचलकरंजी शहराचा सुरळीत पाणीपुरवठा तसेच महानगरपालिकेच्या कोट्यवधीचा जीएसटी परतावा प्रश्नी लवकरच कार्यवाही करणार असल्याचे आश्वासन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. इचलकरंजी शहरात अंदाजित ४३० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांच्या उद्घाटन, भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, खासदार धनंजय महाडिक,



खासदार धैर्यशिल माने, आमदार डॉ. राहूल आवाडे, आमदार अशोक माने, जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस, इचलकरंजी मनपा आयुक्त पल्लवी पाटील, माजी आमदार प्रकाश आवाडे, माजी आमदार सुरेश हाळवणकर आदी मान्यवर उपस्थित होते. सुमारे ४३० कोटी रुपये खर्च करून इचलकरंजी शहरातील महानगरपालिका क्षेत्रात १० तर ५ ग्रामीण भागात विकासकामे करण्यात येणार आहेत. यामध्ये पंचगंगा प्रदूषण उपाययोजनेअंतर्गत औद्योगिक सांडपाणी प्रक्रियेसाठी (मनपा व एमआयडीसी क्षेत्र) ३६१.३१ कोटी, ग्रामीण भागात (जिल्हा परिषद) ५.७५ कोटी, तर शहरात ६२.७७ कोटी रुपयांची विविध विकासकामे करण्यात येणार आहेत. या विविध विकासकामांचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांनी कळ दाबून (रिमोटद्वारे) केले.

जीएसटी परतावा मिळणार– मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, पुढील पाच वर्षांत जीएसटीच्या परताव्यासंदर्भातील प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून लवकरच जीएसटीचा आवश्यक तो परतावा इचलकरंजीकरांना मिळेल. शहराच्या विकासाकरिता आणि येथील उद्योगांसाठी योग्य ती कार्यवाही करून इचलकरंजी शहराचा चेहरामोहरा बदलू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

'श्री शंभूतीर्थ' पुतळ्याचे लोकार्पण –इचलकरंजी महानगरपालिकेच्या वतीने शहरातील कॉ. के. एल. मलाबादे चौक सुशोभीकरण अंतर्गत उभारण्यात आलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे 'श्री शंभूतीर्थ' म्हणून लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती आणि इचलकरंजी महानगरपालिकेच्यावतीने हा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे.

## डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील गट ड संवर्गातील ८६ पदांची अंतिम गुणवत्ता यादी जाहीर

**नांदेड । प्रतिनिधी**

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी नांदेड या संस्थेमध्ये वर्ग- ४ (गट-ड) संवर्गातील विविध २१ संवर्गातील एकूण ८६ पदांच्या पदभरती परीक्षेनंतर उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन, तांत्रिक तपासणी व सर्व संबंधित निकषांचा विचार करून अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात आली आहे. सदर अंतिम गुणवत्ता यादी सोमवार १५ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयाच्या https://www.drscgmcnanded.in अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. संबंधित सर्व उमेदवारांनी अंतिम गुणवत्ता यादी या अधिकृत संकेतस्थळावर पाहावी व पुढील निवड प्रक्रियेबाबत वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी केले आहे. या पदभरतीची २४ एप्रिल २०२५ रोजी अधिकृत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या जाहिरातीस राज्यभरातून सुमारे १६ हजार ९७२ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले असून, या पदभरती प्रक्रियेस उमेदवारांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला होता.

सदर पदभरती प्रक्रियेअंतर्गत पात्र उमेदवारांसाठी ऑनलाईन पद्धतीने लेखी परीक्षा दिनांक २५ जुलै २०२५ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत महाराष्ट्रातील विविध अधिकृत परीक्षा केंद्रांवर घेण्यात आली होती. परीक्षा प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक, निर्भीड व सुरळीतपणे पार पडावी यासाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर स्वतंत्र निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच गैरप्रकार टाळण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व सी.सी.टी.व्ही. जॅमर बसविण्यात आले होते. ही संपूर्ण प्रक्रिया शासनाच्या नियम व मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात आली.

या पदभरतीमुळे महाविद्यालय तसेच रुग्णालयातील मनुष्यबळात वाढ होणार असून, दैनंदिन प्रशासकीय कामकाज अधिक सक्षम होईल तसेच रुग्णसेवेला अधिक गती, गुणवत्ता व कार्यक्षमता मिळण्यास मोठा फायदा होणार आहे, असेही संस्थेच्यावतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

## भैय्यासाहेब आंबेडकरांना शालेय साहित्य वाटप करून अभिवादन

## महामानव अभिवादन ग्रुपचा उपक्रम तर वाचाल तर वाचाल वाचनालया तर्फे ४६ पुस्तकांची उपलब्धता

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाणदिनी मिळालेले शालेय साहित्य वही पेन दानातून इंदिरानगर कॅनल रोड बीड येथे भीमपुत्र यशवंतराव भीमराव उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या ११३ व्या जयंतीदिनी ५८ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. तर वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाच्या ९ व्या केंद्रात सातव्या फेरीतील ४६ पुस्तकांचा संच विद्यार्थ्यांना वाचनाकरता मान्यवरांच्या हस्ते जयश्री साळवे यांना सुपूर्द करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक (एल.आय. सी.) यु.एस.वाघमारे अध्यक्षपदी लाभले होते तर मुख्याध्यापक वैशाली शिंदे- उजगरे प्रमुख



पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. सर्वप्रथम तथागताना पुष्प, तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले, कॅप्टन राजाभाऊ आठवले व वाचनालयाचे अध्यक्ष डि. जी. वानखेडे, यांची विचार मंचावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड. तेजस वडमारे यांनी केले तर प्रस्ताविक के.एस.वाघमारे यांनी केले. कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी भारतीय संविधान प्रस्ताविकेचे सामुदायिक वाचन घेतले. प्रमुख पाहुण्या वैशाली शिंदे यानी विद्यार्थ्यांशी हितगुज साधून भैय्यासाहेब आंबेडकरांनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर धम्म प्रसार व प्रचार व राजकीय कार्यात केलेल्या बहुमोल कार्याबद्दल माहिती दिली. पुस्तक वितरण प्रसंगी या संचातील पुस्तकांचा विद्यार्थ्यांनी पुरेपूर उपयोग घेऊन आपल्या ज्ञानात भर घालावी व वाचन संस्कृतीचे जतन करावे असे नम्र आवाहन केले. कु.स्वराली जावळे ह्या विद्यार्थिनीने भैय्या साहेबांच्या जीवनावर उत्कृष्ट भाषण दिले. त्याबद्दल तिचे वाचनालया तर्फे वही पेन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी मुलांशी हितगुज साधून शिक्षणाबद्दल मोलाचा उपदेश केला. अध्यक्षीय समारोपात वाघमारे यू.एस.यांनी सांगितले की भैय्यासाहेब आंबेडकर यांनी महु ते मुंबई (दादर) पदयात्रा काढून चैत्यभूमीची निर्मिती केली. तसेच भारतीय बौद्ध महासभेद्वारे बौद्धाचार्य प्रशिक्षणाची यशस्वी जबाबदारी पार पाडली.

### पेट्रोरसायन अभियांत्रिकी व उद्योग संस्थेचा विनामूल्य प्लास्टिक प्रोसेसिंग अभ्यासक्रम ; इच्छुकांकडून अर्ज मागविले

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या पेट्रोरसायन अभियांत्रिकी व प्रौद्योगिकी संस्था (सिपेट) यांच्यावतीने प्लास्टीक प्रोसेसिंग मशिन ऑपरेटर हा चार महिने कालावधीचा विनामूल्य अभ्यासक्रम राबविण्यात येतो. या अभ्यासक्रमास इच्छुकांकडून प्रवेश अर्ज मागविण्यात आले आहेत. अर्जाचा नमुना www.cipet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. हा अभ्यासक्रम पूर्णतः निःशुल्क असून राज्यातील रहिवासी असलेल्या १८ ते ३० वर्षे वयोगटातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय , आर्थिक मागासलेल्या गटातील युवक युवतींसाठी हा चार महिने कालावधीचा अभ्यासक्रम विनामूल्य आहे. या अभ्यासक्रमाच्या ५५ जागा असून १० वी उत्तीर्ण किंवा त्याच क्षेत्रातील अनुभव असलेल्या इयत्ता ८ वी पर्यंत शिक्षण झालेले उमेदवारही अर्ज करु शकतील.अधिक माहिती व अर्जाचा नमुना्.लळशिीं.सीं.ळप या संकेतस्थळावर आहे. प्रवेश प्रक्रिया दि.२४ नोव्हेंबरपासून सुरु होत आहे. अधिक माहितीसाठी ९३२५६८७९१०/ ९६०१३६४५५०/ ९१४५६७५५८५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन व्यवस्थापक सिपेट, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.




*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव वडगाव गुंढा ता.जि.बीड येथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ७५ व्या स्मृती दिन निमित्त संस्थेच्या वतीने महिला सक्षमीकरण करिता विविध योजना बद्दल माहिती दिली. यावेळी उपस्थित संस्थेचे अध्यक्ष सौ. छाया दिलीप पवार, सचिव तेजस पवार, तेजस्विनी पवार, सदस्य व मोठ्या संख्येने महिला उपस्थित होते.*

## भागवताचार्य सचिन महाराज सपकाळ यांच्या संगीतमय शिवमहापुराण कथेचे धांडे गल्ली येथे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

कै. जयदत्त बाबूराव सपकाळ यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण दिनानिमित्त बीड शहरातील सुप्रसिद्ध भागवत कथा प्रवक्ते, हरिहर कृपांकित भागवताचार्य सचिन महाराज सपकाळ यांच्या संगीतमय शिवमहापुराण कथेचे आयोजन सपकाळ परिवाराच्या वतीने धांडे गल्ली, बीड येथे करण्यात आले आहे.

या पवित्र शिवमहापुराण कथेचा शुभारंभ बुधवार दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून मंगळवार दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी कथेची सांगता होणार आहे. दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत कथा सादर केली जाणार आहे. शिवमहापुराणातील शिवतत्त्व, भक्ती, वैराग्य, सृष्टी निर्मिती व जीवनमूल्यांचे सखोल विवेचन या कथेतून भाविकांना अनुभवता येणार आहे.

भागवताचार्य सचिन महाराज सपकाळ आपल्या प्रभावी वाणी, ओघवत्या शैली व संगीताच्या सान्निध्यातून शिवमहापुराणाची कथा रसिक श्रोत्यांपर्यंत पोहोचवणार आहेत. त्यांच्या कथाकथनातून शिवभक्तीचा जागर होऊन भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. या कथेकरिता उत्कृष्ट संगीत साथ लाभणार असून मातोश्री ह.भ.प. कुसुमताई सपकाळ (हार्मोनियम व गायन), ह.भ.प. माऊली महाराज घुमरे (सिंथ व गायन), ह.भ.प. जगन्नाथ महाराज कराळे (तबला), ह.भ.प. पवन महाराज सपकाळ (टाळ व गायन) तसेच राधेश्याम महाराज सपकाळ (ढोलक) हे नामवंत कलाकार आपली सेवा अर्पण करणार आहेत. संगीत व भक्ती यांचा संगम साधणारी ही कथा भाविकांसाठी पर्वणी ठरणार आहे.

कै. जयदत्त बाबूराव सपकाळ यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या शिवमहापुराण कथेच्या माध्यमातून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात येणार असून, धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे जतन करण्याचा उद्देश या आयोजनामागे आहे.

शहरातील व परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या संगीतमय शिवमहापुराण कथेचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन सपकाळ परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.


### DECLARATION

I DECLARE BY This PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

OLD NAME

**SIDDIQI SURAYA SULTANA KAZI RAFATTULA**

NEW NAME

**SIDDIQUI SURAIYYA AHEMAD RAYEESUDDIN**

ADD- 145 KB POWER House At Chinchgavaon Majalgaon Dist BEED 431131 MS.


# समाजाच्या भल्यासाठी सकारात्मक पत्रकारितेची गरज : पद्मभूषण पोपटराव पवार

**वडवणी । प्रतिनिधी**

समाजाची स्थिती खालावत आहे .लहान लहान मुले गुटक्याच्या व्यसनाधीन होत आहेत. एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये दहा ते बारा कोटीचा गुटखा विकला जात आहे .शेतकरी हवालदिल आहे. समाजातील सकारात्मक ऊर्जा संपत आहे. अशा परिस्थितीमध्ये सकारात्मक पत्रकारिता फार महत्त्वाचा विषय आहे. समाजाला योग्य दिशेला नेण्यासाठी पत्रकारांची महत्त्वाची भूमिका असून पत्रकारांनी आता आत्महत्येच्या बातम्या सोडून शेतकऱ्यांनी शेतीत केलेल्या प्रयोगाच्या सकारात्मक बातम्या छापाव्यात. असा आग्रह पद्मभूषण पोपटराव पवार यांनी मराठी पत्रकार परिषद व स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित पुरस्कार वितरण प्रसंगी बोलताना धरला. यावेळी त्यांनी देवडी हे गाव आदर्श गाव करण्याचा संकल्प केला. यात मराठी पत्रकार परिषदेची महत्त्वाची भूमिका असेल असे यावेळी त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आरोग्य कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, मराठी पत्रकार परिषदेचे मुंबई विभागाचे अध्यक्ष राजाभाऊ अदाटे, आरोग्य विभागाचे प्रमुख दिपक कैतके, मराठी पत्रकार परिषदेच्या मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, राज्याचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, कोषाध्यक्ष मन्सुर भाई शेख,सुनिल लोणकर, डिजीटल मिडीया राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्यासह सत्कारमूर्ती ज्येष्ठ पत्रकार अमर हबीब, ज्येष्ठ पत्रकार सुभाष देशमुख, शेतीनिष्ठ शेतकरी गोरख झाटे, कल्याण कुलकर्णी आदींची उपस्थिती होती. यावेळी पत्रकारांच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. याच वेळी बीड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकारांचाही सत्कार करण्यात आला. यामध्ये संपादक राजेंद्र आगवान, लोकमतचे माजी जिल्हा प्रतिनिधी जगदीश पिंगळे , धुळ्याचे पत्रकार गो.पी. लांडगे, वडवणीचे सुभाष वाव्हळ यांचा सत्कार करण्यात आला.

पुढे बोलतांना पोपटराव पवार म्हणाले की आज शेतीची स्थिती गंभीर आहे. त्यासाठी सर्वांनी



सकारात्मक प्रयत्न केले पाहिजेत. आज हवामानात बदल होत आहे. मोठ्या प्रमाणात वादळी पाऊस येऊन शेतीचे नुकसान होत आहे. शेतीच्या उत्पादनात घट होत आहे. शहरे वाढत चालली आहेत. मात्र ग्रामीण भागात बकाल अवस्था निर्माण होत आहे. शासनाकडे असे निश्चित कार्यक्रम ग्रामीण भागासाठी नाहीत. ग्रामविकास आणि कृषी विकास साठी निश्चित धोरण निर्माण झाले पाहिजे. या सर्व बाबीसाठी पत्रकारांनी पुढाकार घेऊन सकारात्मकता आणली पाहिजे. शेतकरी आत्महत्याच्या बातम्या कमी आणि शेतातील विविध प्रयोगाच्या बातम्या जास्तीत जास्त छापल्या पाहिजेत. लोकांमध्ये सकारात्मकता निर्माण करण्यासाठी पत्रकारांनी जास्तीत प्रयत्न केले पाहिजेत .मराठी पत्रकार परिषद यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. समाजासाठी विविध आंदोलने परिषदेच्या वतीने होत आहेत. ते करत असताना आदर्श गाव निर्माण करण्यासाठी ही त्यांनी प्रयत्न करावेत. याबरोबर शेतीतील नवीन नवीन प्रयोग लोकांसमोर आणण्यासाठी ही मराठी पत्रकार परिषदेने पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

### पत्रकारांसाठी स्वतंत्र आरोग्य कक्षासाठी प्रयत्न करू: मंगेश चिवटे

यावेळी बोलताना मंगेश चिवटे यांनी पत्रकारांसाठी स्वतंत्र आरोग्य कक्ष निर्माण करू यातून महाराष्ट्रातील सर्व पत्रकारांसाठी त्यांच्या आरोग्याची काळजी घेणारे एक स्वतंत्र कक्ष असेल. याबरोबरच समाजामध्ये अपंगांसाठी आणि कॅन्सर ग्रस्तांसाठी ठाणे जिल्ह्यामध्ये स्वर्गीय आनंद दिघे यांच्या नावाने अनेक हॉस्पिटल चालू झाल्याचे त्यांनी सांगितले. या ठिकाणी एकही रुपया खर्च न करता नागरिकांना सुविधा मिळतात हेही त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या आईच्या नावाने एक सुसज्ज हॉस्पिटल या ठिकाणी उभे राहत आहे ज्या ठिकाणी कॅश काउंटरच नसेल आणि सर्व सुविधा मोफत मिळतील असे त्यांनी आवर्जून सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की माझे आजोबा मराठी पत्रकार परिषदेशी जोडलेले होते. माझे वडीलही मराठी पत्रकार परिषदेत काम करत होते आणि मीही आता मराठी पत्रकार परिषदेची जोडलेला आहे. त्यामुळे आता पत्रकारांच्या आरोग्य समस्यांसाठी कधीही गरज पडली तर मला निर्धास्तपणे फोन करा मी तत्पर असेल असे सांगायला ते विसरले नाहीत. याच वेळी त्यांनी देवडी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीसाठी आपण प्रयत्न करू अशी ग्वाही दिली.

### शेतकरी आत्महत्या नव्हे सिस्टीमचा बळी –अमर हबीब

आज शेतकऱ्यांची व्याख्या करणे कठीण झाले आहे .अनेक जण शेतीचे मालक असतात मात्र त्यांची उपजीविका व्यापारावर ,नोकरीवर अवलंबून असते .मात्र ज्यांची उपजीविकाच शेतीवर अवलंबून आहे तोच खरा शेतकरी अशी व्याख्या ठरली पाहिजे .आणि त्याप्रमाणे शेतकऱ्यांना मदत दिली पाहिजे. आपण वृत्तपत्रांतून वाचतो एखाद्या शेतकऱ्याने आत्महत्या केली की शेतकऱ्याची आत्महत्या असी आपण बातमी लिहितो. मात्र त्याच्या पाठीमागची कारण आपण शोधली पाहिजेत एखाद्या शेतकऱ्याची मुलगी सासरी आसतांना ज्या बापाला त्रास होतो आणि पैशाची मागणी होते. त्यावेळी शेतकरी सांगतो बाई कापूस विकल्यानंतर तुला पैसे देईल. मात्र आसमानी संकटापुढे शेतकरी हतबल होतो आणि त्याचा कापूस कधीच येत नाही आणि आला तरी सिस्टीम मुळे त्याच्या कापसाला भाव येत नाही.


### वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

**श्रीमती पी.व्ही. चव्हाण २ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर केज यांच्या न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ४६१/२०२५, नि.क. २०/ड

रुक्मिन विरुध्द निरंक

विठ्ठल पि. किसन विश्वासे मौजे सुर्डी, ता. केज जि. बीड हे दिनांक २२ माई १२ सन २०२४ रोजी मौजे सुर्डी, ता. केज, जि. बीड येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांनी हया कोसद विठ्ठल पि. किसन विश्वास मौजे सुर्डी, ता. केज. जि. बीड यांचे मृत्यू नंतर त्यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामकाजाचा लाभ मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज विधिज्ञ श्री. एम. ए. गडकर यांचे मार्फत दाखल केला आहे.

अर्जदार– १. रुक्मिन भ्र. विठ्ठल विश्वासे, वय ७५ वर्षे धंदा– घरकाम रा. सुर्डी, ता. केज जि. बीड. २.सदाशिव पि. विठ्ठलराव विश्वासे, वय– ३९ वर्षे धंदा शेती. रा. सुर्डी ता. केज जि. बीड. ३.गणेश पि. विठ्ठल विश्वासे, वय– २९ वर्षे, धंदा– शेती रा. सुर्डी, ता. केज जि. बीड. ४.सुवर्णा भ्र. बाळासाहेब कोळी, वय– ५० वर्षेधंदा– घरकाम रा. खामसवाडी ता. जि. धाराशिव, ५. उर्मिला भ्र. राजेनाऊ यशवंत वय– ३६ वर्षे. धंदा घरकामरा. देवळा, ता. वडवणी जि. बीड. ६. राधिका भ्र. शरद कोळी, वय– ३८ वर्षे. धंदा– घरकाम रा. माटेफळ जि. लातूर, ७. सिता पि. विठ्ठल विश्वासे, वय– ३५ वर्षे. धंदा घरकाम रा. सुर्डी ता. केज जि. बीड. ८.अहिल्या भ्र. किसन कोळी, वय– ३४ वर्षे, धंदा– घरकाम रा. इंदापुर ता. वाशी जि. धाराशिव ९.भाग्यश्री पि. विठ्ठलराव विश्वासे, वय– ३१ वर्षे, धंदा– घरकाम, रा. सुर्डी, ता. केज जि. बीड. १०. पुजा पि. विठ्ठल विश्वासे, वय– २७ वर्षे, धंदा– घरकाम रा. सुर्डी, ता. केज जि. बीड. ११. सिमा पि. विठ्ठल विश्वासे, वय– २४ वर्षे,धंदा– घरकाम रा. सुर्डी, ता. केज जि. बीड.

त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु विठ्ठल पि. किसन विश्वासे, मौजे सुर्डी, ता. केज. जि. बीड यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक १५ माहे ११ सन २०२५.

पु.ता. १८/१२/२०२५

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
स.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर केज

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. १६ डिसेंबर २०२५ ● पान ४

## तलावात सापडला कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह! शरीरावर एकही कपडा नाही

**बीड ।** प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातल्या तिंतरवणी गावात आज सकाळी एक धक्कादायक प्रकार घडला. गावाजवळच्या तलावात एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. ही बातमी कळताच संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली. आज सकाळी काही शेतकरी कामासाठी तलावाकडे गेले असता, पाण्यावर काहीतरी तरंगताना दिसलं. जवळ जाऊन पाहिल्यावर ते एका व्यक्तीचा मृतदेह असल्याचं लक्षात आलं. पाण्यात बराच काळ राहिल्यामुळे मृतदेह फुगलेला आणि कुजलेल्या अवस्थेत होता. हे पाहून शेतकऱ्यांनी तात्काळ चकलांबा पोलीस स्टेशनला माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्यासह चकलांबा पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झालं. पोलिसांच्या उपस्थितीत मृतदेह तलावातून बाहेर काढण्यात आला. मृतदेहाची अवस्था फारच खराब असल्यामुळे तो किती दिवसांपासून पाण्यात होता, याचा अंदाज बांधणं अवघड आहे. तपासादरम्यान मृतदेहाजवळ ओळख पटेल असं कोणतंही कागदपत्र किंवा वस्तू आढळली नाही. अंगावरील कपडे आणि शरीरयष्टी पाहता त्या व्यक्तीचं वय अंदाजे ४० ते ५० वर्षांदरम्यान असावं, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवण्यात आला असून, त्यातून मृत्यूचं नेमकं कारण समजणार आहे. दरम्यान, पोलिसांनी परिसरातील नागरिक, सरपंच आणि पोलीस पाटील यांना आवाहन केलं आहे की, कोणती व्यक्ती बेपत्ता असल्याची माहिती असेल किंवा वर्णन जुळत असेल, तर त्यांनी तातडीने चकलांबा पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा. या घटनेमुळे तिंतरवणीसह शिरूर कासार तालुक्यात भीतीचं वातावरण पसरलं असून, मृत व्यक्तीची ओळख आणि मृत्यूमागचं कारण शोधण्यासाठी पोलीस पुढील तपास करत आहेत.



## २३ वर्षीय तरुणाला भररस्त्यावर लुटले

**बीड ।** प्रतिनिधी

शहरातील बस स्थानकासमोरील बंजारा हॉटेल समोरून जात असताना अनोळखी दोन इसमांनी एका २३ वर्षीय तरुणाच्या खिशातील मोबाईल व रोख रक्कम असा एकूण ६२,००० हजारांचा ऐवज लंपास केल्याची घटना शुक्रवार (दि.१२) रोजी घडली असून अज्ञात दोन जणांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीड शहरात मागील काही दिवसांपासून चोरीच्या घटनेत वाढ होताना दिसत असून वैभव गोरख हुंबे (वय २३) रा.पिंपळनेर ता.जि.बीड या तरुण शहरातील बस स्थानकासमोरील बंजारा हॉटेल समोरून जात असताना त्याच्या खिशातील ३२,००० रुपये रोख रक्कम व ३०,००० रुपये किमतीचा विवो २९ कंपनीचा मोबाईल असा असा एकूण ६२,००० हजारांचा ऐवज बळजबरीने लंपास केल्याची घटना शुक्रवार रोजी रात्री ११:३० च्या सुमारास घडली असून अज्ञात दोन चोरट्यांविरोधात बीड शहर पोलीस ठाण्यात वैभव हुंबे यांच्या फिर्यादीवरून शनिवार ) रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास बीड शहर पोलीस करत आहेत.

## महात्मा फुले युवा दलाचा 'फुले दांपत्य जीवन गौरव पुरस्कार– बारगजे दांपत्याला प्रदान



**बीड ।** प्रतिनिधी

सामाजिक न्याय व बंधुतेच्या मूल्यांवर आधारित कार्य करणाऱ्या दांपत्यांचा सन्मान करण्याची परंपरा महात्मा फुले युवा दलाने सुरू केली असून, या उपक्रमांतर्गत पहिला राज्यस्तरीय 'फुले दांपत्य जीवन गौरव पुरस्कार' इन्फंट इंडिया संस्थेचे संचालक श्री. दत्ता बारगजे व सौ. संध्या बारगजे या दांपत्यास त्यांच्या अतुलनीय सामाजिक कार्याबद्दल प्रदान करण्यात आला. दि. १५ डिसेंबर रोजी बीडजवळील आनंदग्राम, पाली येथे जाऊन अत्यंत सन्मानाने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. बारगजे दांपत्याची सन २०२४–२५ या वर्षासाठी या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. यावेळी सन्मानचिन्ह, फुले पगडी, साडी–चोळी व ११,०००/– रोख रक्कम देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सतीश शिंदे म्हणाले की, दत्ता बारगजे व संध्या बारगजे हे अत्यंत समर्पित भावनेने आनंदग्राममध्ये एचआयव्ही बाधित पालकांच्या मुला–मुलींचे शिक्षण व संगोपन करत आहेत. समाजाकडून दुर्लक्षित व तिरस्कारास पात्र ठरलेल्या या मुलांच्या स्वाभिमान व स्वावलंबनासाठी बारगजे दांपत्य त्यागी वृत्तीने कार्य करत आहे. सत्काराला उत्तर देताना दत्ताभाऊ बारगजे म्हणाले की, बाबा आमटे यांच्या प्रेरणेतून आम्ही या कार्याची सुरुवात केली. समाजाच्या तळागाळातील घटकांसाठी काम करण्याचे मोठे आव्हान स्वीकारले आहे. आनंदग्राम उभे राहताना समाजाचा व अनेक दानशूर व्यक्तींचा मोलाचा सहभाग लाभला. तरीही अनेक अडचणी आहेत. अशा पुरस्कारांमुळे आमच्या कार्याला नवी ऊर्जा व दिशा मिळते. बुद्ध–शिव–फुले–शाहू–आंबेडकर यांच्या विचारांवरच समाजात न्याय व बंधुता निर्माण होईल.

# कुंभार समाजाच्या उन्नतीसाठी कटिबद्ध

## आष्टीमध्ये 'कुंभार सशक्तीकरण' अंतर्गत २० विद्युत चाकांचे वाटप

### कर्नाटकातून उच्च दर्जाची माती आणि प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणार :आमदार सुरेश धस

**आष्टी ।** प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील छोट्या घटकांचा आणि पारंपारिक कारागिरांचा विचार करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजना आखल्या आहेत. याच धर्तीवर कुंभार समाजाच्या हाताला काम आणि कलेला वाव मिळावा, यासाठी भविष्यात कर्नाटकातून चांगल्या दर्जाची माती उपलब्ध करून दिली जाईल, तसेच प्रगत प्रशिक्षणाची सोय केली



जाईल, असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले. खादी व ग्रामोद्योग आयोग, महाराष्ट्र राज्य कार्यालय (मुंबई) आणि केंद्रीय सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ग्रामोद्योग विकास योजने'अंतर्गत आष्टी येथे 'कुंभार सशक्तीकरण कार्यक्रम' पार पडला. या कार्यक्रमाच्या सांगता समारंभात आमदार सुरेश धस बोलत होते. यावेळी २० लाभार्थ्यांना विद्युत कुंभार चाकांचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र कुंभार महासंघाचे अध्यक्ष विनायक राऊत, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, माजी नगरसेवक रावसाहेब देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. दिनांक ६ डिसेंबर ते १५ डिसेंबर २०२५ या कालावधीत स्कील डेव्हलपमेंट फौंडेशन आणि प्रोफेशनल ट्रेनिंग असोसिएट यांच्या मार्फत ▶▶ उर्वरित पान २ वर

**● माती कलेला येणार सुगीचे दिवस**

**आपल्या मार्गदर्शनात आमदार धस पुढे म्हणाले की, सध्या दैनंदिन वापरात मातीच्या भांड्यांचे महत्त्व वाढत असून भविष्यात याला मोठी मागणी असणार आहे. समाजाने एकत्र येऊन हा व्यवसाय केल्यास मोठी प्रगती साध्य होईल. चांगल्या दर्जाच्या वस्तू तयार करण्यासाठी आपण कर्नाटकातून माती आणू. तसेच खामगाव (कर्नाटक) येथे ४ महिन्यांचे प्रगत प्रशिक्षण घेण्यासाठी २० जणांची निवड करण्याची इच्छा आहे, तिथे प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा ४ हजार रुपये मानधन दिले जाईल. तसेच माती मळणी यंत्र आणि कच्च्या मालासाठी बँकेमार्फत अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील.**

## गृहरक्षक दलाचा ७९ वा वर्धापनदिन साजरा

**माजलगाव ।** प्रतिनिधी

शहर पोलिस स्टेशन येथे जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे अध्यक्षतेखाली व केंद्र नायक सुरेंद्र जव्हेरी प्रशासकीय अधिकारी प्रकाशजी बताडे लिपिक श्रीराम गिरबने तालुका समादेशक एम एम पांचाळ पलटण नायक बी जी कुलथे यांचें मार्गदर्शना खाली



रविवार दिनांक १४/१२/२०२५ रोजी सकाळी सात वाजल्यापासून खालील प्रमाणे विविध कार्यक्रमांचे आयोजन शहर पोलीस स्टेशन माजलगाव येथे करण्यात आले आपात्कालीन विमोचन वृक्षारोपण रूट मार्च स्नॅप रोल कॉल आगामी बंदोबस्त विषयी मार्गदर्शन व पथसंचलन आणि स्वच्छता अभियान शहर पोलीस स्टेशन माजलगाव येथे राबवण्यात आले असून मागील पांच दिवसांपासून हा वर्धापनदिना चा कार्यक्रम मोठ्या उत्साहात ▶▶ उर्वरित पान २ वर



*आपल्या LIC बीड शाखेच्या सातबारा महोत्सवात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल श्री . कृष्णा यादव यांना बीड शाखा रत्न २०२५ हा पुरस्कार शुभहस्ते शाखा अधिकारी श्री गणेश औटी साहेब, श्री संदीप जोशी साहेब, विकास अधिकारी श्री प्रशांत सक्सेना सरांच्या हस्ते मिळाला.*

## चिंचोली माळी येथील सर्वांगीण विकास, भ्रष्टाचार चौकशी, महाडिबीटी अनुदानासाठी १७ डिसेंबर रोजी अमरण उपोषण

**केज ।** प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील अतिक्रमणे उर्वरित अतिक्रमण काढून छत्रपती संभाजी महाराज चौक ते श्री संत नामदेव महाराज मंदिर पर्यंत रस्ता व नालीचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे तसेच चिंचोली माळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रला २०१५ ते २०२५ पर्यंत जुन्या व नव्या इमारतींच्या बांधकामासाठी, पुनर्विकासासाठी कीती निधी आला व कीती खर्च केला यांची माहिती देण्यात यावी तसेच चिंचोली माळी येथील ग्रामपंचायत हद्दीत येणारे अतिक्रमण तात्काळ हटविण्यात यावे तसेच चिंचोली माळी येथील गायरान परीसरातील सौरऊर्जा प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करण्यात यावे तसेच चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे तसेच महाडीबीटी अनुदान लाभार्थी शेतकऱ्यांना तात्काळ शेतकऱ्यांना द्या तसेच मौजे चिंचोली माळी ता. केज.जि.बीड येथिल उपसरपंच यांनी पाणी पुरवठा विहरीवरून स्वताची व नातेवाईकाची जमीन भिजवण्यास पाणी वापर केला असल्या बाबत चौकशी करून आजपर्यंत शासकीय योजनेचा गैरवापर केल्या प्रकरणी दंडात्मककारवाई करण्यात यावी,केज तालुक्यातील विहीर व गायगोठा, घरकुलाचे हप्त्ये तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावे, मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची सत्या करणारा एक आरोपी आणखी अटक झाली नाही त्याला अटक करण्यात यावी व सर्व आरोपींना फाशीची ▶▶ उर्वरित पान २ वर

## होळच्या शिवछत्रपती क्रीडा व्यायामशाळेचे मल्ल जिल्हा कुमार कुस्ती स्पर्धेत चमकले



**बीड ।** प्रतिनिधी

आष्टी येथे झालेल्या जिल्हास्तरीय कुमार कुस्ती स्पर्धेत केज तालुक्यातील होळ येथील शिवछत्रपती क्रीडा व्यायामशाळेच्या मल्लांनी उल्लेखनीय यश संपादन करून नाव उज्ज्वल केले आहे. या स्पर्धेत यशराज रत्नाकर मुंडे यांनी ८० किलो वजन गटात उत्कृष्ट कुस्ती दाखवत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच, शिवम दत्ता धोंगडे यांनी ६० किलो वजन गटात दमदार कामगिरी करत छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कुमार कुस्ती स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. या यशाबद्दल दोन्ही पैलवानांचे क्रीडा प्रेमी, प्रशिक्षक, सहकारी मल्ल तसेच शिवछत्रपती क्रीडा व्यायामशाळेच्यावतीने अभिनंदन करण्यात आले. आगामी राज्यस्तरीय तसेच कुमार महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## 'हमारा शौचालय, हमारा भविष्य' मोहीम कागदोपत्रीच

### जिल्हा परिषद कार्यालयात शौचालय स्वच्छता करत गांधीगिरी आंदोलन: डॉ. गणेश ढवळे

**बीड ।** प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद अंतर्गत दि. १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणारी हमारा शौचालय, हमारा भविष्य ही विशेष मोहीम केवळ कागदोपत्रीच राबविण्यात आल्याचा आरोप करत, तिच्या निषेधार्थ जिल्हा परिषद मुख्य कार्यालयात आज गांधीगिरी पद्धतीने 'शौचालय स्वच्छता मोहीम' राबविण्यात आली. हे आंदोलन सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली पार पडले.




ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाड्यांमध्ये आजही अनेक ठिकाणी शौचालयांचा अभाव असून, काही ठिकाणी असलेली शौचालये वापरण्यायोग्य नसल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांसह शिक्षक व कर्मचाऱ्यांची शारीरिक व मानसिक कुचंबणा होत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. या आंदोलनादरम्यान जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, बीडचे पालकमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड,जिल्हाध्यक्ष अशोक येडे ( जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी), नितिन सोनावणे ( महाराष्ट्र प्रवक्ता तथा जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना बीड), सय्यद सादेक ( बीड शहराध्यक्ष आम आदमी पार्टी) बीड माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनूस, सुदाम तांदळे, शेख मुबीन सहभागी होते.केंद्र ▶▶ उर्वरित पान २ वर

## शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन रमेश फपाळ यांना पितृशोक; शंकरराव फपाळ यांचे निधन

**वडवणी ।** प्रतिनिधी



माजलगाव तालुक्यातील बेलुरा गांवचे रहिवासी वारकरी संप्रदायातील शांत व मनमिळाऊ स्वभावाचे फपाळ कुटुंबाचे आधारवड तथा माजलगाव शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रमेश फपाळ यांचे वडील शंकरराव फपाळ यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी माजलगाव या ठिकाणी राहत्या घरी शनिवारी दि.१३ रोजी सायंकाळी ०७:०० वाजता वृद्धपकाळामुळे दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवार दि.१४/१२/२०२५ रोजी मंगलनाथ स्मशानभूमी माजलगाव येथे हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीमध्ये अंत्यसंस्कार झाले त्यांच्या पश्चात ०४ मुले अंगदराव, त्र्यंबकराव,रमेशराव,अंकुशराव व ०१ मुलगी सौ.पुष्पाताई प्रकाशराव नखाते आवरगाव सुना,नातवंडे,पंणतू असा मोठा परिवार आहे. स्व.शंकरराव यांच्या निधनाने फपाळ कुटुंबावर शोककळा पसरली आहे. या दुःखाच्या कठीण प्रसंगातून फपाळ कुटुंबाला बाहेर पडण्यासाठी ईश्वर त्यांना बळ देवो हीच प्रार्थना.

# राज्यस्तरीय प्रश्नमंजूषेत आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा ठसा



## विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेने आणि अभ्यासपूर्ण तयारीने उंचावला महाविद्यालयाचा नावलौकिक

**बीड ।** प्रतिनिधी

आदित्य आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, बीड येथील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय आयुर्वेद प्रश्नमंजूषेमध्ये घवघवीत यश संपादन करत महाविद्यालयाच्या यशस्वी परंपरेला उजाळा दिला. प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय व श्री एकनाथ आयुर्वेद रुणालय, शेवगाव तसेच आयुर्वेद व्यासपीठ शाखा, अहिल्या नगर यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी शेवगाव येथे ही राज्यस्तरीय आयुर्वेद प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत राज्यभरातील विविध आयुर्वेद महाविद्यालयांतील बी.ए.एम.एस. विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या आणि अभ्यासपूर्ण झालेल्या या स्पर्धेत आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत महाराष्ट्र पातळीवर महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला. महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष बी.ए.एम.एस. ची विद्यार्थिनी किरण जगताप हिने सर्वोत्कृष्ट स्पर्धकाचा मान पटकावला. या स्पर्धेसाठी आदित्य ▶▶ उर्वरित पान २ वर

**डॉ. आदिती सारडा यांच्याकडून विद्यार्थांचे कौतूक**

**राज्यस्तरीय आयुर्वेद प्रश्नमंजूषेमध्ये आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश अभिमानास्पद असल्याचे मत संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यासाची, शिस्तबद्ध तयारीची आणि शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाची ही फलश्रुती असल्याचे त्यांनी सांगितले. अशाच प्रकारे ध्येय निश्चित ठेवून गुणवत्ता, आत्मविश्वास आणि परिश्रमाच्या जोरावर वाटचाल केल्यास भविष्यातही मोठी यशस्वी कामगिरी घडेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.**